20 APR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणासाठी एमएसएफडीएची भूमिका महत्त्वाची : डॉ. पी. एस. पाटील

कोल्हापूर : नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने एमएसएफडीए, आयुका या संस्था महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. या संस्थांच्या माध्यमातून शिक्षकांना विविधांगी प्रशिक्षण व विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त करणे. शिकणे व शिकवणे या बाबतीत या संस्थेचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. (छाया : पांडुरंग पाटील)

महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अॅकॅडमी आणि आयुका यांच्या वतीने न्यू कॉलेजमध्ये एस्ट्रॉनॉमी, सायन्स आणि सोसायटी या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक पी. के. पाटील म्हणाले, 'समाजामध्ये खगोलशास्त्राच्या अनुषंगाने असलेले गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. समाजामध्ये ग्रहताऱ्यांविषयी असलेले समज चुकीचे आहेत.' उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी स्वागत केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. कल्याणी गोखले, डॉ. अपूर्वा बर्वे, डॉ. पुष्पा खरे, डॉ. द्रुबा सेकीया, संचालक प्रा. विनय पाटील, आर. डी. पाटील आदी उपस्थित होते. आभार संयोजक डॉ. पी. डी. कांबळे यांनी मानले.



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. पी. के. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. विनय पाटील आदी.

# कल्पकतेच्या जोरावर संशोधनातून अनेक गोष्टी निर्माण करणे शक्य : प्र-कुलगुरू

कोल्हापूर : संशोधकांनी विज्ञानाचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. या अभ्यासाच्या जोरावरच भविष्यामधील संशोधनामध्ये कल्पकतेचा वापर करून अनेक गोष्टी निर्माण करता येतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकॅडमी व आयुका यांच्या वतीने न्यू कॉलेजमध्ये 'एस्ट्रॉनॉमी सायन्स अँड सोसायटी' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक डॉ. पी. के. पाटील अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. कल्याणी गोखले, डॉ. अपूर्वा बर्वे, डॉ. पुष्पा खरे, डॉ. दुब्रा सेकिया, प्रा. विनय पाटील, आर. डी. पाटील आदी उपस्थित होते. प्रा. अनिता मगर-पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळा संयोजक डॉ. पी. डी. कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 APR 2024

पुढारी

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांची परदेशी विद्यापीठात पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील दोन विद्यार्थ्यांची दक्षिण कोरिया आणि फिनलंड येथील नामांकित विद्यापीठांमध्ये पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. फिनलंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ उलू, लूक हेलसिंकी येथे रचना पोतदार यांची पीएच.डी. साठी निवड झाली आहे. बायो बेस्ड अँटी-व्हायरल्स विषयावर २०२४-२८ या कालावधीसाठी त्या काम करणार आहे. दक्षिण कोरियामधील क्यूंग युनिव्हर्सिटी येथे विनय पाटील यांची इलेक्ट्रिकल इंजिअरिंग डिपार्टमेंटमध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. ऑर्गेनिक ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स विषयावर ते काम करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार यांनी अभिनंदन केले.


रचना पोतदार


विनय पाटील

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 APR 2024
सकाळ

# डॉ. आंबेडकरांच्या दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन

कोल्हापूर, ता. १९ : श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित, न्यू कॉलेज, कोल्हापूर येथे एच.टी. अपराध ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन आयोजित केले होते.

ग्रंथप्रदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ ग्रंथसंग्रहांचा तसेच विशेष संदर्भ ग्रंथांचा समावेश होता. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस एस महाजन यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते. कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथपाल डॉ. आर. पी. आडाव यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले, नॅक समन्वयक डॉ. एन. व्ही. पवार, प्रा. के. डी. कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. एस. एन. इनामदार तसेच महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थी तसेच नागरिकांनी गर्दी केली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 APR 2024
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ७७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर ७७ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर जाहीर झाले आहेत.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा सुरू झाल्या आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ कॉमर्स, सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन लँग्वेज, बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, बीएस्सी, एमएस्सी, नॅनोसायन्स, मास्टर ऑफ आर्टस् म्युझिक, एमएस्सी (टेक), मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला ३ हजार ४४७ विद्यार्थी बसले, त्यापैकी ४४७ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

दि. १९ रोजी एम. ए. (मास कम्युनिकेशन), बी.डी.एफ.सी., बी.एफ.टी.एम. अभ्यासक्रमांच्या विविध १३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.


शिवाजी विद्यापीठातून

पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून ५ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.